संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# कुंभमेळा संपन्न राष्ट्रजीवनाचा सोहळा ठरावा

**कोणत्याही** समाजाचे सुकृत हे तिच्या संस्कृतीत दडलेले असते. जगामधल्या अनेक संस्कृती लयाला गेल्या असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली याचे रहस्य कशात असेल तर, ते म्हणजे विविध प्रकारचे सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम म्हणावे लागतील. आजपासून नाशिक, त्र्यंबकेश्वर इथे भरत असलेला महाकुंभमेळा हा अशाच संस्कृतीच्या पूजनाचा भाग ठरतो. हजारो वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा आजही टिकून आहे. याचाच अर्थ समाजाने स्वतःच्या अस्तित्त्वाची पाळेमुळे ही अशा प्रकारच्या उपक्रमांमधून खोलवर रुजवून ठेवली आहेत. अनेक परकीय आक्रमणे येऊन गेली. भारतीय संस्कृतीने ती परतवून लावली. हा पुरुषार्थ इथल्या संस्कृतीने शिकवलेल्या विचारांवरून निर्माण झाला, हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. भारत हा अशा संस्कृतीसंपन्न पुरुषार्थाचा भाग्यवान प्रदेश आहे. प्राचीन साहित्यामध्ये याचा उल्लेख सांस्कृतिक संचित अशाच शब्दात केलेला आढळतो. कुंभमेळ्यासारख्या उपक्रमांना पुराणकालीन घटनांचा संदर्भ आहे. ज्याचा संबंध धर्माच्या आधारे पाप पुण्याच्या कल्पना पुढे करून समाजामध्ये चांगुलपणा टिकवण्याशी जोडता येतो. परंतु याही पलीकडे जाऊन विचार केला तर, यामध्ये सामाजिक सलोखा किंवा एकसंघ राष्ट्रीयतेसाठी आवश्यक असणारा एकात्म भाव हा त्यामागचा काही व्यापक उद्देश असावा, असे म्हणावे लागते. कारण मुळातच भारत हा खंडप्राय देश आहे, अनेक राज्ये मिळून तयार झालेला तो देश आहे. अठरा पगड जातींपासून विविध पंथ, संप्रदायांचा इथे समावेश आहे. या सर्वांना एकत्रित ठेवणे, त्यांच्यामधले मतभेद नाहीसे करणे, त्यासाठी काही ना काही निमित्त आवश्यक होते. कुंभमेळा हा जितका धार्मिक सोहळा आहे, त्यापेक्षा तो राष्ट्रहित साधणारा एक व्यापक उपक्रम आहे, असे म्हटले पाहिजे. यामागचे पुराणकालीन संदर्भ, कुंभमेळा साजरा करण्याच्या विशिष्ट पध्दती, ज्यामध्ये विविध संत, महंत, साधूंचे आखाडे, ध्वजारोहण आणि नेमक्या ज्यावेळेला गुरु सिंह राशीत प्रवेश करतो, त्यावेळी गोदावरीसारख्या नदीमध्ये स्नान करण्याची परंपरा हा सगळा या कुंभमेळ्याचा औपचारिक भाग असतो. वर्षानुवर्षे तो तसाच कायम ठेवून ज्यावेळी अक्षरशः कोट्यवधी लोक एकत्र येतात त्यावेळी त्याचे महत्त्व आपोआप सिध्द होते.

## पौराणिक संदर्भ

यावर्षी गुरु सिंह राशीत प्रवेश करत असल्यामुळे नाशिक किंवा त्र्यंबकेश्वरमध्ये हा कुंभमेळा होत आहे. दर बारा वर्षांनी येणारी ही कुंभमेळ्याची पर्वणी नक्कीच भारतीय संस्कृती मंथनाचीच संधी म्हटली पाहिजे. कुंभमेळ्याचे प्राचीनकालीन संदर्भ पाहिल्यानंतर ज्यावेळेला गुरु कुंभ राशीत असतो, त्यावेळेला हरिद्वारला वृषभ राशीत असतो त्यावेळेला प्रयाग इथे, सिंह राशीत असतो, त्यावेळेला त्र्यंबकेश्वर अर्थात नाशिक येथे आणि गुरु सिंह राशीत असतो. परंतु सूर्य हा मेष राशीत प्रवेश करतो किंवा चंद्राची रास तूळ असते अशा पर्वकाळात हा कुंभमेळा उज्जैन येथे भरतो. देवदानवांचे युध्द झाले आणि समुद्रमंथनातून अमृतकुंभ निघाला. इंद्राचा मुलगा जयंत याच्या हातात असलेला हा कुंभ स्वर्गात सुरक्षितपणे नेला जात होता. तेव्हा त्याच्या सोबतीला गुरु, सूर्य आणि चंद्र होते. अशाही परिस्थितीत दानवांनी पुन्हा हा अमृतकुंभ मिळवण्याचा चार वेळेला प्रयत्न केला. त्यावेळेला ज्या चार ठिकाणी हा कुंभ ठेवून दानवांशी युध्द केले गेले, ती चार ठिकाणे म्हणजेच हरिद्वार, नाशिक आणि उज्जैन, प्रयाग असल्याचे मानले जाते. हे सगळे पुराणकालीन संदर्भ लक्षात ठेवून, आजही लाखो भाविक त्या विशिष्ट मुहूर्तावर स्वतः चे जीवन अमृतमय बनवण्याच्या भावनेने या तीर्थक्षेत्रांना येऊन तिथल्या पवित्र नद्यांमध्ये स्नान करतात. आणि स्वतःच्या मनाच्या समाधानाची एक वेगळी अनुभूती देतात. आज काळ बदललेला आहे. विज्ञान तंत्रज्ञानाचा इतका प्रचंड प्रसार झाला आहे की, अनेकांना या पौराणिक गोष्टी पटत नाहीत. किंवा त्यात प्रत्यक्ष सहभागी न होता त्याला ते नाकारीतही नाहीत. शेवटी भारताचे अध्यात्म हे व्यक्ती आणि प्रकृती, प्रकृती म्हणजे निसर्ग यांच्या समन्वयाचे विज्ञान मानले पाहिजे, परंतु ते समजून घेण्यासाठी किंवा त्याचा अभ्यास करण्यासाठी कोणाची फारशी तयारी दिसत नाही. मात्र यात दडलेले अध्यात्मिक विज्ञान हेदेखील मनुष्याला सुखी समाधानी एवढेच नव्हे तर, निरोगी जीवनाची हमी देणारे ठरते. एखाद्या घटनेकडे आपण कोणत्या श्रध्देतून आणि भावनेतून पाहतो किंवा त्याचे आचरण करतो यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. अतिशय श्रध्दायुक्त अंतःकरणाने हजारो वर्षे ही परंपरा पाळली गेली. म्हणून आज भारत हे राष्ट्र ताठ मानेने उभे राहू शकले. हे तर कोणाला नाकारता येणार नाही.

## पापपुण्य नव्हे संपन्न जीवन

जसे आम्ही सुरुवातीला म्हटले की देवदानवांच्या युध्दातून देवांना अमरत्व प्राप्त करणारे अमृत त्यात मिळाले. परंतु आज बदललेल्या काळामध्ये सुखी आणि संपन्न समाजजीवनासाठी कुंभमेळा या उपक्रमाबाबत विचारमंथन झाले पाहिजे. आणि त्यातून समाजाला पोषक ठरणारी तत्वे आचरणात आणली गेली पाहिजेत. ज्याप्रमाणे कुंभमेळ्याच्या निमित्ताने वेगवेगळे साधुसंत अहंकाराचा गर्व दाखवतात. त्यातून अनेक आखाडे एकमेकांच्याविरुध्द उभे ठाकतात. एकीकडे ज्या संस्कृतीमध्ये साधूत्व किंवा संन्यासीपण स्वीकारल्यानंतर निरहंकारी होण्याचा उपदेश देते, त्याच ठिकाणी जर अशा प्रकारचा अहंकार आणि द्रोह पहायला मिळत असेल, तर तो सर्वात मोठा विरोधाभास ठरतो. आज बदललेल्या परिस्थितीत भारताच्या संस्कृतीने जपलेला हा अध्यात्मिक वारसा विज्ञान तंत्रज्ञानाचे बोट धरून अधिक व्यापक होत गेला पाहिजे. सगळ्या समाजाला एकत्र करणारा आणि समाजातल्या पुरुषार्थाला अधिक संपन्न बनवणारा झाला पाहिजे. खरे तर जगाच्या पाठीवर अशा प्रकारचा एवढा प्रचंड धार्मिक किंवा सांस्कृतिक सोहळा भारतात होत असावा. यातला धार्मिक कर्मकांडाचा भाग हळूहळू कमी करून हा कुंभमेळा सांस्कृतिक राष्ट्रीयत्वाचा सोहळा कसा आहे, हे हळूहळू समाजजीवनावर बिंबवले गेले पाहिजे. पापपुण्यापेक्षाही सगळे समाजजीवन किंवा राष्ट्रजीवन संपन्न करण्यासाठी या अभूतपूर्व एकत्रीकरणाचा निश्चित उपयोग होऊ शकतो.